# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## सप्टेंबरच्या शेवटी महाराष्ट्रात पावसाचं पुनरागमन होणार, हवामान विभागानं वर्तवला मोठा अंदाज

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली, तर काही जिल्हे अद्यापही पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. अशातच बंगालच्या उपसागरात हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होत आहे. येत्या २० ते २५ सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरामध्ये पावसात मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना दिलासा मिळणार असून, अंतर्गत भागातही पावसाचा जोर वाढणार आहे, असे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे. तर येत्या १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम मुसळधार पावसाचा अंदाज आहे. ते २१ सप्टेंबरला नाशिकमध्येही मध्यम पाऊस पडेल. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत मध्यम पावसाची शक्यता आहे. २२ सप्टेंबरला मराठवाड्यातही पाऊस राहील.

२१ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहेत. हा मान्सूनच्या हंगामाचा शेवटचा टप्पा असून, या पावसामुळे कोरड्या हवामानातून दिलासा मिळू शकतो. बळीराजाला यामुळे काहीसा दिलासा मिळणार आहे.


(वर्ष ६५ वे अंक २३५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.१९ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# निकषांची वाट न पाहता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करा!

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार द्या; शरद पवारांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र



मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यात पावसाने प्रदीर्घ काळ ओढ दिल्याने निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी संकटाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र लिहून तातडीच्या उपाययोजनांची आग्रही मागणी केली आहे. 'शासनाने औपचारिक निकषांची वाट न पाहता गंभीर परिस्थिती असलेल्या तालुक्यांमध्ये त्वरित दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपयांची थेट आर्थिक मदत द्यावी आणि शेतमजुरांच्या खात्यात २५ हजार रुपये जमा करावेत,' अशा प्रमुख मागण्या पवारांनी या पत्राद्वारे केल्या आहेत. राज्यातील विविध शेतकरी संघटनांकडूनही दुष्काळ जाहीर करण्याच्या मागण्या जोर धरत असताना शरद पवारांच्या या पत्रामुळे सरकारवरील दबाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात शरद पवार यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील विदारक वास्तव मांडले आहे. 'यंदा मान्सूनने मोठ्या प्रमाणावर पाठ फिरवल्यामुळे सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग आणि उडीद ही सर्वच खरीप पिके वाळून करपून गेली आहेत. पावसाअभावी उर्वरित पिकांवर कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून, उत्पादन खर्चही निघणे अशक्य झाले आहे. शेतीसोबतच पिण्याचे पाणी आणि पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचला असून ग्रामीण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होण्याची भीती निर्माण झाली आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासकीय नियमांच्या तांत्रिक निकषांची व ५ ऑक्टोबरच्या औपचारिकतेची प्रतीक्षा न करता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करावा. बाधित तालुक्यांना दुष्काळसदृश घोषित करून सर्व दुष्काळी सवलती तत्काळ लागू कराव्यात.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात हेक्टरी किमान ५०,००० रुपयांची मदत जमा करावी. तसेच शेतीकामे ठप्प झाल्याने रोजगारापासून वंचित राहिलेल्या शेतमजूर कुटुंबांना प्रत्येकी २५,००० रुपयांची विशेष आर्थिक मदत द्यावी.

तीव्र पाणीटंचाई असलेल्या गावांचे व वाड्यांचे तात्काळ सर्वेक्षण करून शासकीय टँकर सुरू करावेत. पशुधन वाचवण्यासाठी शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कोणत्याही अटींशिवाय चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पशुधनासाठी पाणी व वैद्यकीय सेवा पुरवाव्यात.

शरद पवारांनी लिहलेल्या पत्राबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आधीच उपाय योजना सुरु केल्याचे सांगितले. दुष्काळाची स्थिती राज्य सरकारने गांभीर्याने घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## शेतकऱ्यांना ठोस मदत देणार; ७-८ दिवसांत दुष्काळाचा अंतिम अहवाल-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना थातूरमातूर मदत न करता भविष्यात भक्कम आधार मिळेल अशी सर्वंकष उपाययोजना राज्य सरकार करणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत दुष्काळाच्या विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, प्रशासनाला थेट बांधावर उतरण्याचे आदेश दिले आहेत. पुढील ७ ते ८ दिवसांत दुष्काळाचा सविस्तर अहवाल येईल आणि त्या आधारे केंद्र व राज्य सरकारकडून मदतीचा ठोस निर्णय घेतला जाईल. याशिवाय 'महाखनिज २.०' धोरण, शक्तिपीठ महामार्ग, आजारी बालिकेचा उपचार आणि राजकीय घडामोडींवर त्यांनी सविस्तर भाष्य केले.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, 'दुष्काळाच्या मुद्द्यावर कोणीही राजकारण करण्याची गरज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत संवेदनशील असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्व विषय बाजूला ठेवून त्यांनी दुष्काळाला 'टॉप प्रायॉरिटी' दिली आहे. महसूल, कृषी, मदत व पुनर्वसन विभागासह सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कामाला लावले आहे.' १८ जिल्ह्यांचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असला तरी केवळ त्या आधारे निर्णय घेता येत नाही. सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे नेमके किती नुकसान झाले, याचा अंतिम अहवाल पुढील मंगळवार-बुधवारपर्यंत म्हणजेच ७ ते ८ दिवसांत येईल. २०१७ किंवा २०१८ च्या शासन निर्णयांच्या धर्तीवर शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल.

'मी स्वतः काही जिल्ह्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. सर्व पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि आमदारांना मतदारसंघात फिरून शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.' पूर्वीच्या चारा छावण्यांमध्ये मक्तेदारांनी भ्रष्टाचार केल्याचे आमच्या लक्षात आले आहे. त्यामुळे यंदा चारा छावण्या किंवा डेपो सुरू करताना कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची काटेकोर खबरदारी घेतली जाईल. तसेच परतीच्या पावसाने हजेरी लावल्यास दुष्काळाची तीव्रता कमी होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

## मराठा आरक्षणाची ९ ऑक्टोबरपासून पुन्हा नव्याने सुनावणी; न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली नवे पूर्णपीठ स्थापन

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- सरकारी नोकऱ्या व शिक्षणात मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याला विरोध करणाऱ्या याचिकांवरील सुनावणीसाठी न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार व न्यायमूर्ती संदीप मारणे यांचे नवे पूर्णपीठ स्थापन करण्यात आले आहे. या नव्या पूर्णपीठापुढे येत्या ९ ऑक्टोबरपासून प्रकरणावर पुन्हा नव्याने सुनावणी सुरू होणार आहे.

कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती होण्यापूर्वी न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती जमादार आणि न्यायमूर्ती मारणे यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची जवळपास गेल्या वर्षभरापासून नियमित सुनावणी सुरू होती. याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकारतर्फे राज्याचे महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांचा युक्तिवाद सुरू होता. तथापि, न्यायमूर्ती घुगे यांची कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्याने नियमानुसार प्रकरणाची पूर्णपणे नव्याने सुनावणी सुरू होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रकरणाच्या नव्याने होणाऱ्या सुनावणीसाठी न्यायमूर्ती कर्णिक यांच्या अध्यक्षतेखालील नवे पूर्णपीठ स्थापन करण्यात आले.

या नव्या पूर्णपीठापुढे शुक्रवारी प्रकरणाची पहिली सुनावणी पार पडली. त्यावेळी आरक्षणाला विरोध करणारे याचिकाकर्ते संजीत शुक्ला यांच्यावतीने वरिष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी या याचिकांवरील नव्याने सुनावणीची ही तिसरी वेळ असल्याचे न्यायालयाला सांगितले.

यापूर्वी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठापुढे प्रकरणाची सुनावणी झाली. परंतु, त्यांची दिल्ली उच्च न्यायालयात बदली झाल्यानंतर आणि मराठा नेते मनोज जरांगे यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मुंबईत केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती घुगे यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठ प्रकरणाच्या सुनावणीसाठी स्थापन करण्यात आले होते.

## मनोज जरांगेंच्या आंदोलन प्रकरणी ईडीच्या चौकशीमध्ये सगळं बाहेर येईल; अमोल खुणेंचा दावा

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी आज (१७ सप्टेंबर) उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या शिष्टमंडळाच्या भेटीनंतर मनोज जरांगेंनी ९० दिवसांसाठी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच उपोषण स्थगित केलंय, मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगेंनी स्पष्ट केलं. मनोज जरांगे यांनी सरकारला ९० दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतर आता मनोज जरांगे यांच्या उपोषणावरून त्यांचे जुने सहकारी अमोल खुणे यांनी अनेक आरोप करत निशाणा साधला आहे. माध्यमांशी बोलताना अमोल खुणे म्हणाले की, ह्या आंदोलनाला रसद पुरवणाऱ्यांची नावे घेता येत नाही. पण, ईडीच्या चौकशीमध्ये सगळं बाहेर येईल, कुणी रसद पुरवली कोणी पैसे दिले. मी कुठल्या मंत्र्याचं आमदाराचं, खासदाराचे नाव घेऊ शकत नाही. या गोष्टी ईडीच उघड्या पाडणार आहे. अब्दुल सत्तार यांनी याला ६ कोटी दिल्यामुळे यांनी संजय शिरसाटांना टार्गेट केलं. अब्दुल सत्तारांना संभाजीनगरचा पालकमंत्री व्हायचं आहे. सामाजिक न्यायमंत्र्याचे पद सत्तारांना घ्यायचा आहे.शिरसाट यांना टार्गेट करायची सत्तारांकडून सुपारी घेतली आहे. हे पैसे कोणी आणले, कसे आणले, कुठे ठेवले, हे सगळं ईडीच्या चौकशीत समोर येणार आहे. मी तुला ८०-९० टक्के उघड पाडलं आहे, तुझा जय हिंद, जय महाराष्ट्र, नक्की होणार आहे. पुढच्या उपोषणाला शिष्टमंडळ येणार नाही, कुठला मंत्री येणार नाही, हे मी आत्ताच सांगतो, तू एखाद्या महाराजाकडून नाहीतर गावातल्या माता माऊलीकडून पाणी पिऊन उपोषण सोडणार आहेस. याची लायकी काय हे पाटोद्यामधूनच लोकांना कळलं, जनतेला कळलं याच्याकडून न्याय भेटणार नाही. हा बारावा उपोषण करणार आणि तिथेच संपणार बाराव्या उपोषणाला याचे बाराच वाजणार आहेत, असंही खुणे पुढे बोलताना म्हणालेत.

## ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळाचे पंचनामे सुरू करणार असल्याची फडणवीसांची माहिती

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यातील दुष्काळी परिस्थिती, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत परदेशी विद्यापीठांचे आगमन आणि विरोधकांच्या आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर भाष्य केले. राज्यात ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळाचे पंचनामे सुरू करून शेतकऱ्यांना 'एनडीआरएफ'ची मदत मिळवून दिली जाईल, अशी मोठी घोषणा त्यांनी केली. तसेच, नवी मुंबईत भव्य 'एज्युसिटी' उभारली जात असून, राहुल गांधी हे अराजकतावादी मानसिकतेतून लोकशाही संस्थांवर आरोप करत असल्याचा घणाघातही त्यांनी केला.

राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील मोठ्या घडामोडीची माहिती देताना फडणवीस म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. याचाच एक भाग म्हणून 'वेस्टर्न ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटी'सह तब्बल ७ परदेशी विद्यापीठे महाराष्ट्रात येत असून, त्यांच्या कॅम्पसचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले आहे. नवी मुंबईत एक भव्य 'एज्युसिटी' तयार होत असून, तेथे सुमारे ८० हजार ते १ लाख विद्यार्थी जागतिक दर्जाचे शिक्षण घेऊ शकतील. याशिवाय, मुख्यमंत्री शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ३ भारतीय विद्यार्थ्यांना १००टक्के शिष्यवृत्ती देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यातील दुष्काळाबाबत राज्य सरकारला पत्र पाठवले होते. या पत्रावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, 'राज्य सरकारने यापूर्वीच दुष्काळ निवारणासाठी आवश्यक ती पावले उचलली आहेत. राज्यात कर्जमाफीची अंमलबजावणी सुरू असून, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्थाही युद्धपातळीवर केली जात आहे. पावसाळ्याचा हंगाम संपल्यानंतर म्हणजेच ५ ऑक्टोबरनंतर नुकसानीचे पंचनामे केले जातील आणि त्यानंतर एनडीआरएफची मदत मिळवण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही.'

## पाकिस्तानमध्ये मशिदीजवळ भीषण स्फोट; १४ ठार, अनेकजण जखमी

कोहाट दि.१७ (वृत्तसंस्था)- पाकिस्तानमधील कोहाट येथे मशिदीजवळ भीषण स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. या स्फोटात १४ जण ठार झाले असून, अनेक जण जखमी झाले आहेत. स्फोटानंतर बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरु केले. समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार स्फोटात जखमी झालेल्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, कोहाट येथील जुनी पोलीस लाईन परिसरात हा स्फोट झाला. मशिदीच्या जवळच हा स्फोट झाल्याचे काही स्थानिकांनी म्हटले आहे. स्फोट झाल्यानंतर बचाव पथक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, हा स्फोट नेमका कशामुळे झाला? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी बंदोबस्त वाढवला असून, रस्ते वाहतुकीसाठी बंद केले आहेत.

या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या अधिक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार स्फोटा १४ जणांचा मृत्यू झाला असून, ५० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. दगावलेल्या नागरिकांचे मृतदेह जिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत. स्फोटानंतर परिसरात अतिरिक्त पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. प्रशासनाकडून नागरिकांना देखील सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## खोटे आरोप सिद्ध करा, अन्यथा अब्रूनुकसानीचा दावा ठोकू; मनोज जरांगेंचे सहकारी गंगाधर काळकुटेंचा बारस्कर यांना इशारा

जालना दि.१८ (प्रतिनिधी)- आपल्यातच वाद होऊ नये आणि मराठा समाजात चुकीचा संदेश जाऊ नये म्हणून मी आजवर अजय बारस्कर आणि अमोल खुने यांच्यावर बोलणे टाळले होते. मात्र, आता त्यांनी पुराव्यांनिशीच बोलावे, अन्यथा त्यांना हे महागात पडेल आणि वेळप्रसंगी आम्ही त्यांना कोर्टातही खेचू, असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनी दिला आहे. तसेच, जरांगे पाटील यांच्या घातपात प्रकरणात मी तक्रार दिल्यामुळेच तो अडकला, असा अमोल खुने याचा समज झाल्याने त्याचा माझ्यावर राग असल्याचेही काळकुटे यांनी पुढे स्पष्ट केले.

गंगाधर काळकुटे म्हणाले, भय्यु महाराजांची दोनशे कोटींची जमीन हडपली, पुण्यात सात गुंठे जागा घेतली असे यापूर्वी माझ्यावर आरोप केले गेले. त्याचे पुरावे द्या अन्यथा अब्रूनुकसानीचा दावा ठोकणार. उगाच खोटे आरोप करू नका, माझी ब्रेन मॅपिंग, नार्को टेस्ट करा आणि दोषी आढळल्यास टकमक टोकावरून ढकलून द्या किंवा भर चौकात फाशी द्या, असे आव्हान काळकुटे यांनी केले आहे. तसेच मी कॉन्ट्रॅक्टर आहे, पण तीन वर्षांत एकही काम केलेले नाही. मनोज दादांपासून आम्ही बाजूला होऊन दादा एकटे पडावेत असे कोणालातरी वाटत असल्याचा संशय काळकुटे यांनी बोलून दाखवला आहे. सरकारचे शिष्टमंडळ आणायला मी एवढा मोठा आहे का? हवे तर माझे फोन कॉल्स तपासा आणि अमोल खुणे हा काय ईडीचा प्रवक्ता आहे का? असा संतप्त सवाल करत, मी बीडमध्येच असून मला कधीही अटक करा, उलट पुढच्या आठवड्यात मी स्वतःच ईडीच्या कार्यालयात जाणार आहे, असे खुले आव्हान गंगाधर काळकुटे यांनी दिले.

## साखरेचा साठा करण्याची मर्यादा ३० दिवसांवर; सरकारचा निर्णय

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसापासून साखरेच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र आपल्याला पाहायला मिळालं होतं. लोक साखरेच्या वाढत्या किमतींमुळे चिंतेत होते. कारण सणासुदीच्या काळात साखरेचा खप सर्वाधिक असतो. दरम्यान, अशातच एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. साखरेच्या दरात २५ टक्क्यांची घसरण झाली आहे. त्यामुळं ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. तसेच सरकारने आता साखर साठा करण्याच्या नियमांमध्ये काही बदल केले आहेत, ज्यामुळे साखरेच्या किमती लवकरच कमी होण्याची शक्यता आहे.

सरकारने मोठ्या प्रमाणात साखर खरेदी करणाऱ्यांसाठी साठा करण्याची मर्यादा १५ दिवसांवरून ३० दिवसांपर्यंत वाढवली आहे, मात्र यासाठी अट अशी आहे की अतिरिक्त साखर साठा केवळ आयात केलेल्या साखरेतूनच खरेदी केला जाऊ शकतो. याचा अर्थ असा की, केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर वापरणाऱ्या कंपन्यांसाठी साठा करण्याची मर्यादा वाढवली आहे.

पूर्वी, अशा कंपन्या केवळ १५ दिवसांसाठीच साखरेचा साठा करू शकत होत्या. आता ही मर्यादा ३० दिवसांपर्यंत वाढवण्यात आली आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की १५ दिवसांपेक्षा जास्त असलेला कोणताही अतिरिक्त साठा केवळ आयात केलेल्या साखरेतूनच आला पाहिजे. ही साखर आगाऊ प्राधिकृत योजना आणि दरपत्रक कोट्याअंतर्गत खरेदी करणे आवश्यक आहे. खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या साखरेच्या साठा मर्यादेत कोणताही बदल होणार नाही; ती १५ दिवसांपर्यंत मर्यादित राहील. दरम्यान, साखरेच्या वाढत्या दरामुळं गेल्या काही दिवसापासून ग्राहकांच्या खिशाला मोठा झल बसत असल्याचं चित्र पाहायला मिळालं होतं.

## १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांकडून वारंवार अत्याचार; रायगडमधील थरकाप उडवणारी घटना

रायगड दि.१८ (प्रतिनिधी)- रायगडमधील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांकडून वारंवार अत्याचार केल्याचा हादरवणारा प्रकार समोर आला आहे. यामध्ये ५ पैकी दोन आरोपी अल्पवयीन आहेत.

रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात एका एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ५ जणांनी वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, एका महिन्यापूर्वीच म्हणजे २३ ऑगस्ट रोजी देखील म्हसळा तालुक्यात एका अनुसूचित जातीच्या एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना घडली होती. त्यामुळे एका महिन्यात ही दुसरी घटना घडल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

## राज्यातील दहावी-बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार असल्याची माहिती आहे. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर होणार असून या तारखांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी व्यवस्थित नियोजन करता येणार आहे.

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. इयत्ता बारावीच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एचएससी) आणि दहावीच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षांचे वेळापत्रक मंडळाने जाहीर केले आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा ही सोमवार, ८ फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असून, मंगळवार, १६ मार्चपर्यंत चालणार आहे. तर दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा सोमवार, १५ फेब्रुवारीपासून सुरू होऊन गुरुवार, ११ मार्च रोजी संपणार आहे.

## राहुल गांधींची मानसिकता अराजकतावादी, मुख्यमंत्री फडणवीस यांची टीका

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी)- 'राहुल गांधींची मानसिकता अराजकतावादी आहे', अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. 'भारतीयांनी राहुल गांधींचे नेतृत्व नाकारले आहे, हे ते मान्य करत नाहीत. जखम कपाळाला आहे आणि पट्टी गुडघ्याला बांधत आहेत', असेही फडणवीस म्हणाले.

वेस्टर्न ऑस्ट्रेलिया इंडिया विद्यापीठाच्या कॅम्पसचे शुक्रवारी (१८ सप्टेंबर) मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. 'नव्या शिक्षण प्रणालिमुळे विदेशी विद्यापीठांना देशात कॅम्पस सुरु करण्याची परवानगी मिळाली. या अंतर्गत सात विद्यापीठं महाराष्ट्रात आली आहेत. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया इंडिया विद्यापीठात जागतिक दर्जाचे शिक्षण मिळेल शिवाय परकीय चलनाची देखील बचत होईल. विद्यापीठ संशोधनाचे केंद्र बनत असल्याने अर्थव्यवस्थेला देखील त्याचा फायदा होईल', असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राहुल गांधींनी शिवसेना, राष्ट्रवादी आणि तृणमूल काँग्रेसचे नाव आणि चिन्हाबाबत केलेल्या टीकेवरुन देवेंद्र फडणीवसांना प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना, 'आपला पराभव लपवण्यासाठी आणि भारतीयांनी राहुल गांधींचे नेतृत्व नाकारले आहे, हे ते मान्य करत नाहीत. जखम कपाळाला आहे आणि पट्टी गुडघ्याला बांधत आहेत ही त्यांची समस्या आहे. भारतीय लोकांना काय हवंय? लोकं मोदींच्या मागे का आहेत? हे त्यांना कळेल, त्यादिवशी त्यांचं निवडणुकांमध्ये पराभव होणे थांबले किंवा त्याचा त्यांना काहीतरी फायदा होईल. राहुल गांधींची मानसिकता अराजकतावादी आहे', अशी टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

'भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांना बदनाम करायचे, त्या संस्थांवरील लोकांचा विश्वास उडाला पाहिजे. आणि लोकांचा विश्वास उडाला की लोकशाहीवरचा विश्वास उडाला पाहिजे, आणि लोकशाहीवरील विश्वास उडाला की संविधानावरील विश्वासही उठला पाहिजे अशा प्रकारची मांडणी राहुल गांधी करत आहेत', अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

# संकटाच्या काळात संवेदनशीलतेची गरज

पावसाळा संपत आला, तरी आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडत आहे. कधी अतिवृष्टी, कधी पावसाचा प्रदीर्घ खंड आणि कधी अवकाळी हवामानङ्कनिसर्गाच्या या लहरीपणाने शेतीचे गणितच विस्कटून टाकले आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाची तूट जाणवत असून मराठवाड्यातील परिस्थिती विशेष चिंताजनक बनली आहे. शेतकऱ्याने मोठ्या अपेक्षेने पेरणी केली. बी-बियाणे, खते, औषधे, मशागत यासाठी पैसा खर्च केला. पिके उभी राहिली; पण त्यांना दाणे भरण्याच्या आणि उत्पादन हातात येण्याच्या काळात पावसाने दडी मारली. परिणामी सोयाबीन, कापूस, तूर यांसारख्या खरीप पिकांवर संकट आले आहे. काही भागांत पिके करपू लागली असून उत्पादन घटण्याची भीती व्यक्त होत आहे.

ही केवळ शेतीची समस्या नाही. शेतकऱ्याचे पीक हातातून गेले की त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. शेतमजुराला काम मिळत नाही, पशुधनासाठी चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो, बाजारपेठेतील उलाढाल मंदावते आणि कर्जाचा भार वाढतो. त्यामुळे दुष्काळाकडे केवळ 'पाऊस कमी झाला' या एका वाक्यात पाहणे चुकीचे ठरेल. आज सर्वात मोठी गरज आहे ती वेळेत निर्णय घेण्याची. पंचनामे कागदावर होऊन उपयोग नाही; प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन नुकसानीचे वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. पीक नुकसानीची मदत, पीकविमा, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा आणि रोजगाराच्या संधी याबाबत प्रशासनाने आगाऊ नियोजन केले पाहिजे. दुष्काळ जाहीर करण्याच्या निकषांवर चर्चा होत असताना संकटग्रस्त कुटुंबांना मदत मिळण्यासाठी अंतिम घोषणेची वाट पाहणे कितपत योग्य आहे, याचाही विचार व्हायला हवा. पाण्याचा प्रश्न तर आणखी गंभीर आहे. आज खरीप पिके वाचविण्याचा प्रश्न आहे; उद्या रब्बी हंगाम आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा राहू शकतो. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन, पाण्याचा अपव्यय रोखणे, गावपातळीवर जलसंधारण आणि भविष्यातील पाणी नियोजन यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. केवळ टँकर पाठवून दुष्काळ संपत नाही; टँकर ही तात्पुरती सोय आहे, कायमस्वरूपी उपाय नाही.

संकटाच्या काळात राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा शेतकऱ्याच्या बांधावरची परिस्थिती महत्त्वाची आहे. सरकार, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि समाजातील विविध घटकांनी एकत्रितपणे काम करण्याची ही वेळ आहे. मदत जाहीर करण्यापेक्षा ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत किती लवकर पोहोचते, हे अधिक महत्त्वाचे आहे.

निसर्गाचे संकट आपल्या हातात नसले, तरी संकटाचे व्यवस्थापन आपल्या हातात आहे. पाऊस कधी येईल हे माणूस ठरवू शकत नाही; पण पाऊस कमी पडल्यास शेतकरी, मजूर, पशुपालक आणि सामान्य नागरिकांना कसे सावरणार, याचे नियोजन नक्कीच करता येते. आजचा दुष्काळ हा उद्याच्या नियोजनाची परीक्षा आहे. या परीक्षेत केवळ कागदोपत्री आकडे नव्हे, तर संवेदनशील प्रशासन, तातडीची मदत आणि दीर्घकालीन जलव्यवस्थापन यांची खरी गरज आहे. संकट मोठे आहे; पण सामूहिक इच्छाशक्ती आणि योग्य नियोजन असेल तर त्यातून मार्ग नक्कीच काढता येईल.

मराठवाड्याच्या आभाळाने यंदा शेतकऱ्यांची पुन्हा एकदा परीक्षा घेतली आहे. पेरणीच्या वेळी पावसाची आशा, पिके उभी राहिल्यानंतर पावसाची प्रतीक्षा आणि आता पीक वाचविण्यासाठी आभाळाकडे लागलेले डोळेङ्कही शेतकऱ्याच्या जगण्याची शोकांतिका झाली आहे. पाऊस पडला तर अतिवृष्टीची भीती आणि पाऊस थांबला तर दुष्काळाची तलवार! निसर्गाच्या या लहरीपणाला शेतकरी किती दिवस तोंड देणार?

मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाचा दीर्घ खंड पडला आहे. पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पाऊस गायब झाल्याने सोयाबीन, कापूस, तूर यांसह खरीप पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे. धाराशिव जिल्ह्यात तब्बल ८० दिवस पाऊस न झाल्याचे सरकारी अहवालात नमूद करण्यात आले असून, काही भागांत ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत पीकनुकसानीचा अंदाज व्यक्त झाला आहे. हे आकडे केवळ सरकारी अहवालातील संख्या नाहीत. प्रत्येक टक्क्यामागे एका कुटुंबाचे स्वप्न आहे. प्रत्येक करपलेल्या रोपामागे शेतकऱ्याने खर्च केलेला पैसा आहे. प्रत्येक रिकाम्या शेतामागे बँकेचे कर्ज आहे. आणि प्रत्येक अपयशी हंगामामागे पुढील वर्षाची चिंता आहे.

दुष्काळाची व्याख्या, निकष, समित्या, अहवाल आणि पंचनामे हे प्रशासनाच्या कामकाजाचा भाग आहेत; परंतु शेतकऱ्याच्या बांधावर उभे राहून करपलेले पीक पाहताना त्याला सरकारी परिभाषा नको असते. त्याला आधार हवा असतो. त्याला मदत हवी असते. त्याला पुढच्या हंगामात पुन्हा उभे राहण्यासाठी हात हवा असतो. दुष्काळ घोषित करण्यासाठी नियम असतील, तर ते नियम जनतेच्या मदतीसाठी आहेत की जनतेला मदतीपासून दूर ठेवण्यासाठी? हा प्रश्न आज विचारण्याची वेळ आली आहे.

राज्यातील पावसाच्या तुटीमुळे अनेक जिल्ह्यांत खरीप पिकांवर परिणाम झाल्याचे प्रशासनिक पातळीवरही मान्य करण्यात आले आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीला राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाची मोठी तूट नोंदवली गेली होती. दरम्यान, काही भागांत पावसाच्या सरी कोसळल्या म्हणून संकट संपले असे समजणेही धोकादायक आहे. दोन दिवसांचा पाऊस दोन महिन्यांचा खंड भरून काढू शकत नाही. जमिनीतील ओल, पिकांची अवस्था, धरणांतील पाणीसाठा, विहिरींची पातळी आणि पुढील हंगामाची गरज या सर्वांचा एकत्रित विचार करावा लागणार आहे. दुष्काळाचा परिणाम केवळ शेतकऱ्यावर होत नाही. शेतकरी संकटात आला की शेतमजुराचे काम बंद होते. गावातील दुकानदाराची उलाढाल घटते. ट्रॅक्टर, कृषी सेवा, वाहतूक, बाजारपेठङ्कसगळ्या साखळीवर त्याचा परिणाम होतो. पशुधनासाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न उभा राहतो. रोजगारासाठी स्थलांतर वाढते. गाव रिकामे होण्याची प्रक्रिया सुरू होते.

# लोकभाषेतून समतेचा संदेश : श्रीचक्रधरस्वामींचे समाजप्रबोधन

**महाराष्ट्राच्या** सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासात बारावे-तेरावे शतक हा परिवर्तनाचा महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या काळात समाजजीवनावर कर्मकांड, रूढी, जातिभेद, वर्णभेद आणि धार्मिक वर्चस्व यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर होता. अशा परिस्थितीत सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित प्रश्नांना स्पर्श करणारा, लोकभाषेतून तत्त्वज्ञान समजावून सांगणारा आणि मानवतेला केंद्रस्थानी ठेवणारा विचारप्रवाह महाराष्ट्रात आकाराला आला. या परिवर्तनाच्या प्रवाहातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्रीचक्रधरस्वामी होय. महानुभाव पंथाचे प्रवर्तक म्हणून त्यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. लोकभाषेचा आग्रह, सर्वसामान्यांपर्यंत विचार पोहोचविण्याची भूमिका, अहिंसेचा पुरस्कार, जातिभेदाविरुद्धची भूमिका, स्त्रियांना अध्यात्मिक मार्गाची संधी आणि मराठी भाषेच्या विकासाला मिळालेली चालना या विविध अंगांनी श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा समकालीन संदर्भात विचार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

मराठी विश्वकोशानुसार त्यांचे मूळ नाव हरिपाळदेव होते. पुढे त्यांनी महाराष्ट्रात येऊन व्यापक भ्रमंती केली आणि आपल्या विचारांचा प्रसार केला. त्यामुळे त्यांच्या चरित्राचा अभ्यास करताना भक्तिपरंपरा, साहित्यिक स्रोत आणि इतिहासाधारित माहिती यांचा योग्य संदर्भात विचार करणे आवश्यक ठरते. त्यांच्या जीवनाचे महत्त्व तत्कालीन समाजाला विचार करण्यास भाग पाडणाऱ्या प्रश्नांमध्ये आणि त्यांच्या उपदेशाच्या सामाजिक परिणामांत आहे.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांची सर्वांत महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे त्यांनी आपले तत्त्वज्ञान लोकांच्या भाषेत मांडले. त्या काळात संस्कृत ही विद्वत्तेची आणि धार्मिक ग्रंथांची प्रमुख भाषा होती. त्यामुळे सामान्य जनतेला तात्त्विक विचार सहज उपलब्ध होत नसत. श्रीचक्रधरस्वामींनी मात्र मराठीचा स्वीकार करून सामान्य माणसाशी थेट संवाद साधला. मराठी विश्वकोशात नमूद केल्याप्रमाणे ते स्वतः गुजराती भाषिक असूनही मराठी भाषेतून आपल्या विचारांचा प्रसार करीत. हा केवळ भाषेचा बदल नव्हता, तर ज्ञानाच्या सामाजिक लोकशाहीकरणाची प्रक्रिया होती. ज्ञान काही मोजक्या विद्वानांच्या हातात मर्यादित न राहता सामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे, या भूमिकेचा त्यात प्रत्यय येतो.

याच कारणामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा संबंध मराठी भाषेच्या प्रारंभीच्या विकासाशी जोडला जातो. त्यांच्या शिष्यांनी आणि अनुयायांनी पुढे मोठ्या प्रमाणावर ग्रंथनिर्मिती केली. म्हाइंभटांनी संकलित केलेले 'लीळाचरित्र' हे मराठीतील आद्य चरित्रग्रंथ मानले जाते. श्रीचक्रधरांच्या जीवनातील विविध प्रसंग, संवाद आणि उपदेश यांचे संकलन या ग्रंथात झाले. या ग्रंथाचे महत्त्व केवळ महानुभाव पंथाच्या दृष्टीने नाही, तर तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप, सामाजिक जीवन आणि लोकव्यवहार समजून घेण्यासाठीही आहे. मराठी विश्वकोशानुसार 'लीळाचरित्र' साध्या, सरळ आणि घरगुती गद्यभाषेत लिहिले गेले असून त्यातून त्या काळातील व्यवहारातील मराठीचे दर्शन घडते.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांमध्ये मानवतेला विशेष स्थान आहे. त्यांच्या उपदेशात अहिंसेचा पुरस्कार आढळतो. हिंसा, द्वेष, अन्याय आणि सामाजिक भेदभाव यांच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनाकडे पाहण्याची भूमिका त्यांच्या विचारांमध्ये दिसते. महानुभाव पंथाने जातिनिरपेक्षता आणि अहिंसेचा पुरस्कार केला, असे मराठी विश्वकोशातील विवेचनातून स्पष्ट होते. या भूमिकेचा तत्कालीन सामाजिक संदर्भ लक्षात घेतला तर त्याचे महत्त्व अधिक जाणवते. समाजात जन्माधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना प्रबळ असताना मानवाच्या आध्यात्मिक क्षमतेचा विचार जन्मावर न करता त्याच्या आचरणाशी जोडणे ही परिवर्तनशील भूमिका होती.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मोक्षमार्ग सर्वांसाठी खुला असावा, ही भूमिका. त्या काळातील धार्मिक जीवनात सामाजिक स्तरानुसार अनेक प्रकारच्या मर्यादा अस्तित्वात होत्या. महानुभाव परंपरेत स्त्रिया आणि समाजातील विविध स्तरांतील व्यक्तींना आध्यात्मिक साधनेची संधी मिळाल्याचे उल्लेख आढळतात. स्त्री-शूद्रांना मोक्षमार्ग खुला करण्याच्या भूमिकेचा उल्लेख महानुभाव पंथाच्या अभ्यासात केला जातो. त्यामुळे आध्यात्मिक समानतेची कल्पना ही त्यांच्या परंपरेतील महत्त्वाची बाब मानता येते. आजच्या संविधानिक समतेच्या युगात या विचारांकडे पाहताना त्यातील मानवकेंद्री मूल्य विशेष अधोरेखित होते.

श्रीचक्रधरस्वामींचे कार्य समजून घेताना त्यांचे गुरू श्रीगोविंदप्रभू यांचाही संदर्भ महत्त्वाचा आहे. महानुभाव परंपरेनुसार गोविंदप्रभू हे चक्रधरस्वामींचे गुरू होते. गोविंदप्रभूंच्या जीवनचरित्रातही रूढ सामाजिक चौकटींपलीकडे जाणारे मानवतावादी वर्तन दिसते. अनाथ आणि असहाय व्यक्तींना आधार देणे, सामाजिक भेदांच्या पलीकडे जाणे आणि माणसाला माणूस म्हणून स्वीकारणे या गुणांचा उल्लेख त्यांच्या चरित्रपरंपरेत आढळतो. या गुरुपरंपरेतून चक्रधरस्वामींच्या विचारांना आकार मिळाला, असे महानुभावीय साहित्याच्या संदर्भातून दिसून येते.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे कर्मकांडापेक्षा अंतःकरणातील आचरणाला दिलेले महत्त्व होय. धर्म हा केवळ बाह्य विधी, आडंबर किंवा कर्मकांडांपुरता मर्यादित नसावा, तर तो व्यक्तीच्या नैतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाशी जोडला गेला पाहिजे, असा त्यांच्या विचारांचा आशय दिसतो. त्यांनी सामान्य माणसाच्या अनुभवविश्वातून तत्त्वज्ञान स्पष्ट केले. त्यामुळे त्यांचा संवाद हा केवळ विद्वानांशी नव्हता; तो शेतकरी, कामकरी, स्त्री, सामान्य गृहस्थ आणि विविध सामाजिक स्तरांतील लोकांशी होता. ज्ञानाची भाषा लोकांना समजणारी असावी, ही त्यांची भूमिका आजच्या शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भातही महत्त्वाची वाटते.

त्यांच्या विचारांमध्ये 'दृष्टांत' या पद्धतीचा वापर विशेष उल्लेखनीय आहे. एखादा अवघड तात्त्विक विचार थेट आणि गुंतागुंतीच्या भाषेत सांगण्याऐवजी दैनंदिन जीवनातील उदाहरणाद्वारे स्पष्ट करणे ही प्रभावी संवादपद्धती आहे. आज शिक्षणशास्त्रात अनुभवाधारित शिक्षण, संदर्भाधारित शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्री शिक्षण यांना मोठे महत्त्व दिले जाते. श्रीचक्रधरस्वामींच्या उपदेशपरंपरेतील दृष्टांतपद्धतीचा विचार केला तर लोकांच्या अनुभवांशी जोडून विचार मांडण्याची ही जुनी आणि प्रभावी परंपरा होती, असे दिसून येते.

श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता राहिला नाही. महानुभावीय साहित्याने मराठी गद्याला महत्त्वपूर्ण योगदान दिले. चरित्रग्रंथ, सूत्रग्रंथ, भाष्यग्रंथ, तात्त्विक लेखन, काव्य, स्थलवर्णन आणि विविध प्रकारच्या साहित्यनिर्मितीमुळे मराठीच्या अभिव्यक्तीक्षमतेत भर पडली. मराठी विश्वकोशाच्या विवेचनानुसार महानुभावीय वाययाने प्रारंभीच्या मराठी गद्याचे दालन समृद्ध केले. व्याकरण, तत्त्वज्ञान, साहित्य आणि भाष्यपरंपरेच्या निर्मितीतही या साहित्यपरंपरेचे योगदान आहे. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचा विचार करताना मराठी भाषा आणि साहित्याच्या इतिहासातील त्यांचे स्थान दुर्लक्षित करता येणार नाही.

या परंपरेतील महिलांच्या सहभागाचाही स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. महानुभावीय परंपरेत महदाइसा किंवा महदंबा यांसारख्या स्त्रियांचे योगदान आढळते. महदंबा ही बुद्धिमान आणि विरक्त स्त्री होती, तसेच 'लीळाचरित्रा'च्या संकलनाच्या कार्यात तिची मदत झाली असावी, असे मराठी विश्वकोशातील नोंदीवरून दिसते. या संदर्भामुळे मध्ययुगीन धार्मिक-सांस्कृतिक जीवनात स्त्रियांचा सक्रिय सहभाग आणि त्यांच्या बौद्धिक क्षमतेची दखल घेणाऱ्या परंपरांचा अभ्यास करण्यास नवे आयाम मिळतात.

आजच्या काळात श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांकडे पाहताना त्यांचे ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही मध्ययुगीन विचारवंताचे मूल्यमापन आधुनिक मूल्यांच्या चौकटीत सरळपणे करणे योग्य नाही. त्यांच्या काळातील सामाजिक परिस्थिती, धार्मिक व्यवस्था, ज्ञानव्यवस्था आणि भाषिक स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले पाहिजे. त्याचबरोबर महानुभाव पंथाच्या पुढील विकासातील काही मर्यादा, अंतर्गत मतभेद आणि आचारविचारांतील बदल यांचाही चिकित्सक अभ्यास झाला पाहिजे. मराठी विश्वकोशातील विवेचनात या पंथाच्या वैचारिक आणि सामाजिक प्रभावाबरोबरच पुढील काळातील काही मर्यादांचाही उल्लेख आहे. त्यामुळे श्रद्धा आणि चिकित्सक इतिहासदृष्टी यांचा समतोल राखणे आवश्यक ठरते.

आज भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची हमी दिली आहे. जात, धर्म, लिंग, भाषा किंवा सामाजिक स्थितीच्या आधारे भेदभाव न करण्याची संविधानिक मूल्यव्यवस्था ही आधुनिक भारताची मूलभूत ओळख आहे. या पार्श्वभूमीवर श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांतील मानवकेंद्री आणि समतेचा आग्रह असलेल्या पैलूंचा नव्याने विचार करता येतो. सामाजिक समता ही केवळ कायद्याची बाब नसून ती मनोवृत्तीमध्ये रुजली पाहिजे. माणसामाणसांतील भेदभाव कमी करण्यासाठी विचार, शिक्षण आणि सामाजिक संवाद आवश्यक असतो. या दृष्टीने लोकांपर्यंत विचार पोहोचविण्याची श्रीचक्रधरस्वामींची पद्धत आजही प्रेरणादायी ठरू शकते.

आज डिजिटल माध्यमांच्या काळात ज्ञानाचा प्रसार पूर्वीपेक्षा अधिक वेगाने होत आहे; परंतु माहितीची विपुलता म्हणजे ज्ञानाची उपलब्धता असे नाही. माहिती समजून घेणे, तिचे चिकित्सक विश्लेषण करणे आणि तिचा समाजहितासाठी उपयोग करणे आवश्यक आहे. श्रीचक्रधरस्वामींनी आपल्या काळात लोकभाषेचा आधार घेऊन ज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचविले. आजच्या काळातही शिक्षण मातृभाषेत, सोप्या भाषेत आणि लोकांच्या जीवनानुभवांशी जोडून दिले गेले पाहिजे. ग्रामीण, आदिवासी, वंचित, दिव्यांग, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत ज्ञान पोहोचविण्याच्या प्रक्रियेत ही भूमिका विशेष महत्त्वाची आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात लोकभाषा, लोकजीवन आणि सामाजिक प्रश्न यांचा संबंध अतिशय घनिष्ठ आहे. संतपरंपरा, महानुभाव परंपरा आणि इतर परिवर्तनवादी प्रवाहांनी सामान्य जनतेशी संवाद साधण्यासाठी लोकभाषेचा प्रभावी उपयोग केला. या व्यापक परंपरेत श्रीचक्रधरस्वामींचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी विचाराला लोकांपर्यंत नेले आणि लोकांच्या अनुभवांना तात्त्विक चर्चेचा भाग बनविले. त्यामुळे त्यांचे कार्य हे केवळ एका धार्मिक पंथाच्या इतिहासापुरते मर्यादित न ठेवता महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनाच्या इतिहासाचा एक भाग म्हणून अभ्यासले पाहिजे.

श्रीचक्रधरस्वामी जयंती ही केवळ एका महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा दिवस न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस ठरला पाहिजे. आजही समाजात जातीय भेदभाव, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, हिंसा, द्वेष, स्त्री-पुरुष असमानता आणि ज्ञानातील दरी यांसारखी आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत समता, अहिंसा, मानवता, लोकभाषेतील संवाद आणि सर्वांसाठी ज्ञानाची उपलब्धता या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. कोणत्याही संत-विचारवंताचा खरा सन्मान केवळ जयघोषात नसतो; त्यांच्या विचारातील समाजहितकारी मूल्ये वर्तमान जीवनात आचरणात आणण्यात असतो.

श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचा व्यापक वारसा म्हणजे विचार करण्याची प्रेरणा, लोकांशी संवाद साधण्याची पद्धत, मराठी भाषेच्या विकासाला मिळालेली चालना आणि मानवी प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या मूल्यांची जपणूक. त्यांच्या विचारांचा चिकित्सक अभ्यास केल्यास मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाजजीवन, धार्मिक परिवर्तन, भाषिक विकास आणि साहित्यनिर्मिती यांचे अनेक पैलू उलगडतात. 'लीळाचरित्र'सारख्या ग्रंथाने मराठी चरित्रलेखनाची वाट खुली केली, तर 'सिद्धांतसूत्रपाठ' आणि 'दृष्टांतपाठ' यांनी तात्त्विक विचारांना ग्रंथरूप दिले. ही परंपरा महाराष्ट्राच्या बौद्धिक इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे.

म्हणूनच श्रीचक्रधरस्वामी जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या जीवनाकडे केवळ भक्तिभावाने नव्हे, तर इतिहास, समाजशास्त्र, भाषा, साहित्य आणि मानवी मूल्यांच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे, भाषा ही जनसामान्यांशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम असली पाहिजे आणि धर्म-अध्यात्माच्या चर्चेच्या केंद्रस्थानी माणूस व त्याचे नैतिक जीवन असले पाहिजे, असा व्यापक संदेश त्यांच्या कार्याच्या अभ्यासातून घेता येतो. बदलत्या काळात विचारांची पुनर्मांडणी होत असली तरी मानवतेची गरज कायम असते. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या जयंतीचा खरा अर्थ त्यांच्या विचारांचे अंधानुकरण करण्यात नसून त्यांच्या काळातील प्रश्नांमधून आजच्या समाजासाठी उपयुक्त मूल्ये शोधण्यात आहे. समता, अहिंसा, मानवता, लोकभाषेचा सन्मान आणि सर्वांसाठी ज्ञानाची दारे खुली ठेवण्याचा संकल्प केला, तर श्रीचक्रधरस्वामींच्या स्मृतीला तीच खरी आणि अर्थपूर्ण आदरांजली ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी एकजुटीने पाठपुरावा करणार : आमदार अब्दुल सत्तार

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) - मराठवाड्याच्या कायम स्वरूपी दुष्काळग्रस्त व अवर्षणप्रवण भागाला हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी शासन स्तरावर प्रभावीपणे पाठपुरावा करू, अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.



मराठवाडा समन्यायी पाणीपुरवठा-पाणी वाटप संघर्ष समितीच्या वतीने डॉ. अण्णासाहेब शिंदे व इतर पदाधिकाऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेल्या धरणे आंदोलनाला १७ सप्टेंबर रोजी आमदार अब्दुल सत्तार यांनी भेट देत पाठिंबा दर्शविला. यावेळी त्यांनी आंदोलकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या व भूमिका जाणून घेतल्या.

पार-गोदावरी नदीजोड योजना तसेच कोकणातील उल्हास आणि वैतरणा खोऱ्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे मंजूर असलेले १५५ टीएमसी पाणी अडवून ते मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त व अवर्षणप्रवण तालुक्यांना समन्यायी पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी ठोस कार्यवाही करण्याची मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

मराठवाड्यातील शेतकरी सातत्याने पाणीटंचाई आणि सिंचनाच्या समस्येला सामोरे जात आहेत. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी सूक्ष्म नियोजनासह नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. वैतरणा खोऱ्यातील उपलब्ध पाणी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागाकडे वळिवल्यास मराठवाड्याच्या मोठ्या क्षेत्राला दीर्घकालीन फायदा होऊ शकतो, असे सत्तार यांनी यावेळी सांगितले.

गोदावरी नदीच्या पात्रालगतचा परिसर वगळता मराठवाड्याचा मोठा भाग आजही दुष्काळाच्या समस्येला सामोरा जात आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष दूर करण्याबरोबरच मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

या प्रश्नावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी ठोस पाठपुरावा करण्याचे आश्वासनही आमदार सत्तार यांनी दिले. मराठवाड्याला पुरेसे सिंचनाचे पाणी उपलब्ध झाल्यास शेतीला स्थैर्य मिळेल आणि या भागाच्या आर्थिक व सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

# लव रंजन घेऊन येत आहेत ६ नवे चेहरे, 'पहला प्यार दूसरी बार' २३ ऑक्टोबरला होणार रिलीज!

'पहला प्यार दूसरी बार'च्या निर्मात्यांनी अखेर चित्रपटाचे पहिले पोस्टर रिलीज केले आहे. या पोस्टरमध्ये उत्साहाने भरलेला नवा ग्रुप पाहायला मिळत असून, हा चित्रपट २३ ऑक्टोबर २०२६ रोजी चित्रपटगृहात दाखल होण्यासाठी सज्ज आहे. फ्रेंडशिप-कॉमेडी या जॉनरमधील या चित्रपटाचे दिग्दर्शन पदार्पण करणारे दिग्दर्शक अनुज सैनी यांनी केले आहे, तर लव फिल्म्सने या चित्रपटाची निर्मिती केली आहे.




रिलेशनशिपवर आधारित मनोरंजक चित्रपट देणाऱ्या या बॅनरने हिंदी सिनेसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता आपल्या या चित्रपटातून हा बॅनर अलीशा चोप्रा, स्पर्श वालिया, साक्षी वैद्य, कुणाल वैद्य, सरगुन कौर लूथरा आणि तुषार छिब्बर या सहा नव्या चेहऱ्यांना ऑन-स्क्रीन लॉन्च करत आहे. चित्रपटाच्या रिलीज झालेल्या जबरदस्त फर्स्ट लुक पोस्टरमध्ये हे सर्व युवा कलाकार एकत्र पाहायला मिळत आहेत.

'पहला प्यार दूसरी बार'चे फर्स्ट लुक पोस्टर अतिशय मजेशीर, मॉडर्न आणि ग्लॅमरने भरलेले असल्याने रिलीज होताच सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. पोस्टरमध्ये सर्व कलाकार मस्तीभऱ्या पोझमध्ये आपल्या स्टायलिश लूकमध्ये दिसत आहेत.

पोस्टरमधील रंगीत ट्रीटमेंट त्याला बोल्ड आणि डायनॅमिक अंदाज देते. निर्मात्यांनी या नव्या चेहऱ्यांची शानदार पद्धतीने ओळख करून दिली आहे, ज्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता नक्कीच वाढणार आहे. चित्रपटाचे लक्षवेधी नाव आणि आकर्षक पोस्टर पाहून या नव्या कलाकारांना आणि त्यांच्या कथेला जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण होत आहे.

नव्या चेहऱ्यांना लॉन्च करणे हे लव रंजन यांच्यासाठी परिचित असले तरी तितकेच मजेदार काम आहे. याबद्दल लव रंजन म्हणतात, न्यूकमर्सना लॉन्च करणे हे नेहमीच एक आव्हान राहिले आहे, पण हे असे आव्हान आहे ज्याची मला खरोखरच प्रतीक्षा असते. आजपासून पंधरा वर्षांपूर्वी 'प्यार का पंचनामा'च्या माध्यमातून मला ही संधी मिळाली होती आणि 'पहला प्यार दूसरी बार'च्या माध्यमातून पुन्हा एकदा अशीच संधी माझ्यासमोर आली, तेव्हा मला माहित होते की ही संधी मला सोडायची नाही. एक लेखक म्हणून सहा नव्या चेहऱ्यांसाठी एक जग निर्माण करणे आणि त्यांना त्या जगात स्वतःची रिदम शोधताना पाहणे, मला खूप आवडले. जेव्हा लोकांना चांगले वाटते, तेव्हा कथा स्वतःची एक वेगळी एनर्जी शोधून काढते आणि हे सहा कलाकार प्रेक्षकांना भेटणार आहेत, याबद्दल मी खूप उत्सुक आहे.

'पहला प्यार दूसरी बार' हा चित्रपट 'लव फिल्म्स'द्वारे प्रस्तुत करण्यात येत आहे, तर त्याचे दिग्दर्शन अनुज सैनी यांनी केले आहे. लव रंजन आणि अंकुर गर्ग या चित्रपटाचे निर्माते आहेत. हा चित्रपट २३ ऑक्टोबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे.

# महावितरणमध्ये मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बावणे यांनी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रभारी मुख्य अभियंता मनीष ठाकरे, प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, अधीक्षक अभियंता महेश पवार, विजय मोरे, उपमहाव्यवस्थापक कांचन राजवाडे, उपसंचालक शशांक देशमुख, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, शंकर कुलकर्णी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, प्रणाली विश्लेषक मनीषा निफाडकर, कैलास देशमुख, अनिल जाधव, तौसिफ पटेल, राजाराम पाटील, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, गिरीश गायकवाड, प्रसाद महातोले, प्रवीण जोशी, विलास खंडाळे, अविनाश चांदेकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळ अभिनव उपक्रम सामाजिक बांधिलकी जपत ४० रक्तदात्यांचे रक्तदान



वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) – देशात रक्ताचा प्रचंड तुटवडा, याची जाण ठेवत व सामाजिक बांधीलकी जपत येथील हरिदास गल्लीतील कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळाने शुक्रवार (ता.१८) रोजी आयोजित रक्तदान शिबिरात चाळीस गणेश भक्तांनी रक्तदान करून, गणपती बाप्पाना नमन केले. या रक्तदान शिबिराचा आरंभ सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी व जेष्ठ नागरिक संघ सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत सकाळी नऊ वाजता झाला. छत्रपती संभाजीनगर येथील श्री.दत्ताजी भाले रक्तपेढी, डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या कर्मचारी वर्गाचे प्रमुख आप्पासाहेब सोमासे यांच्या मार्गदर्शनखाली हे रक्त संकलित केले. या आधी कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळाच्या गणेश भक्तांनी गोशाळातील गायींना चारा पुरविला, तसेच शहराचे आराध्य दैवत असलेल्या खंडोबा मंदिर परिसरात वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन, संरक्षण व संवर्धन करण्याचा संकल्प केला. गणेश मंडळाचे अध्यक्ष गौरव दौडे, सदस्य व गणेश भक्त मधुकर कुहिले, गणेश पहाडी, महेश आंबेकर, आकाश चापानेरकर, कृष्णा क्षीरसागर, सचिन गिरे, महेश पहाडी, स्वप्नील राजपूत, कोमल वर्मा, विशाल दाभाडे,अमोल तास्कर, आकाश हिवाळे सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक उपक्रम राबवित आहेत.

## वैजापूर शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात मराठवाडा(हैद्राबाद) मुक्ती संग्राम दिन उत्साहात



वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) – मराठवाडा (हैद्राबाद)मुक्ती संग्राम दिनानिमीत्त वैजापूर शहरातील शासकीय, निमशासकीय कार्यालये व शैक्षणिक संस्थात तसेच ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था व कार्यालयात गुरुवार(ता,१७) रोजी सकाळ साडेसात पासून साडे आठ पर्यंत ध्वजवंदन करण्यात आले मुख्य शासकीय ध्वजवंदन उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपविभागीय दंडाधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड यांच्या हस्ते उपविभागीय कार्यालयात झाले.

नगरपालिकेत, नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मृती स्तंभ प्रांगणात वीरपत्नी श्रीमती लक्ष्मीबाई जयराम भोसले यांच्या हस्ते, तसेच पंचायत समिती त सभापती वंदना शिंदे, उपसभापती सोनाली जाधव, तहसील कार्यालयात तहसीलदार सुनील सावंत. पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उप विभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, तर विनय सोनावणे यांनी ध्वजवंदन केले.या प्रसंगी मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत, सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, गटविकास अधिकारी श्री जायभाए, पॅरा मि लिटरी चे जवान मेजर गौतम गायकवाड, नगरसेवक दशरथ बनकर, ज्योती जोशी, श्रीमती कविता शिंदे, अशोक पवार, नायब तहसीलदार रामेश्वर महाजन, पोलीस उप निरीक्षक मनीषा जगताप, नगरसेवक विशाल संचेती, राजेश गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, डॉ.निलेश भाटीया, जेष्ठ नागरिक साहेबराव साळुंके, अशोक धसे, कमलाबाई लोंढे, दीपक राजपूत, श्री.मिटकरी यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक, पारस घाटे, बाबासाहेब पुतळे, श्री. थोरात, मंगेश नाईकवाडी, मंडळ अधिकारी श्रीमती पुरी, निर्मला जाधव यांच्यासह नागरिक, कर्मचारी उपस्थित होते.

## महावितरणमध्ये प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – थोर समाजसुधारक प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक व परिमंडल कार्यालयात साजरी करण्यात आली. सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे यांच्या हस्ते प्रबोधनकारांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रभारी मुख्य अभियंता मनीष ठाकरे, प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, अधीक्षक अभियंता महेश पवार, विजय मोरे, उपसंचालक शशांक देशमुख, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक शंकर कुलकर्णी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, सहायक संचालक अनिल वळवी, कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, प्रसाद महातोले, विलास खंडाळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महावितरणच्या कार्यकारी संचालकपदी अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा, सुनील काकडे रूजू



छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – महावितरणच्या प्रादेशिक संचालक / कार्यकारी संचालकपदी प्रतिनियुक्तीच्या भरती प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर श्री. अंकुर कावळे, श्री. संदीप पाटील, श्री. चंद्रमणी मिश्रा व श्री. सुनील काकडे यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला. नवनियुक्त कार्यकारी संचालक याआधी महावितरणमध्ये मुख्य अभियंता म्हणून विविध ठिकाणी कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. अंकुर कावळे याआधी मुख्यालयात मुख्य अभियंता (वितरण) म्हणून कार्यरत होते. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीम ध्ये पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. सन १९९७ मध्ये सहायक अभियंता म्हणून श्री. कावळे तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये रूजू झाले. पदोन्नतींनंतर त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर येथे विविध पदांवर काम केले आहे. सन २०२५ पासून ते मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. संदीप पाटील यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली असून सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंतापदी तर सन २०२५ मध्ये त्यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली. श्री. संदीप पाटील हे मुख्य अभियंता (वीज खरेदी) म्हणून मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. चंद्रमणी मिश्रा यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली आहे. सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतींवर त्यांनी अलिबाग, वाशी, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे काम केले आहे. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. तर सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून तर सन २०२४ मुख्य अभियंतापदी पदोन्नतीने झाली. श्री. मिश्रा कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. कार्यकारी संचालक श्री. सुनील काकडे यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर विविध पदांवर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर, कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. श्री. काकडे यांची सन २०२२ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. भांडूप परिमंडलानंतर सन २०२५ पासून श्री. सुनील काकडे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

## वसुधैव कुटुंबकम' हाच आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा पाया - प्रा. संजीव सोनवणे

### 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय' परिसंवादातील सर्वच तज्ज्ञ परीसंवादकांचा सूर




नाशिक,दि. १८ (प्रतिनिधी) – दि. १५ सप्टेंबर रोजी जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडिओवर 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय' या विषयावर ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे आयोजित हे २४ वे ज्ञानसत्र दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. परिसंवादातील तज्ज्ञांनी 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा महत्त्वपूर्ण पाया असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ज्ञानसत्राचे समन्वयन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

परिसंवादात लोकशाहीची जागतिक संकल्पना, दक्षिण आशियातील लोकशाहीची वाटचाल, विविधता, नागरिकांचा सहभाग, विरोधी पक्षांची भूमिका तसेच लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने यांवर चर्चा करण्यात आली. लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, संवाद, सहअस्तित्व आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित व्यापक व्यवस्था असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'लोकशाहीची दक्षिण आशियाई जडणघडण : सार्क देशांची वाटचाल, विविधता आणि आव्हाने तसेच विरोधी पक्षांची भूमिका' या विषयावर विचार मांडले. दक्षिण आशियातील विविध देशांतील लोकशाही संस्थांची वाटचाल, सामाजिक-सांस्कृतिक विविधता, नागरिकांचा सहभाग आणि विरोधी पक्षांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. द्वितीय परिसंवादक प्रा. सुजाता मोरे यांनी 'भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता' या विषयावर सविस्तर विवेचन केले. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग, सार्वजनिक प्रश्नांविषयीची जागरूकता आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. पर्यटनशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक सहभागाच्या विविध पैलूंवरही त्यांनी प्रकाश टाकला. तिसरे परिसंवादक प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी 'अमेरिकन व भारतीय लोकशाहीचा तुलनात्मक आढावा' घेताना दोन्ही देशांच्या लोकशाही व्यवस्थांची वैशिष्ट्ये आणि संस्थात्मक रचनेचे विवेचन केले. यानंतर त्यांनी 'पालक लोकशाहीचे' हे समयोचित काव्य सादर केले.

या ज्ञानसत्राचा लाभ अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक आणि नागरिकांना घेता यावा, यासाठी कार्यक्रम विद्यापीठाच्या https://avc.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख श्री. धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर व श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दीपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या ज्ञानसत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले आहे.

## गुरू -शिष्य यांचा एकाच मंचवर सत्कार



वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) – येथील सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी व जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी आपल्या ३७ वर्षाच्या शैक्षणिक कारकिर्दीत अनेक डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वर्ग-१ व वर्ग-२ चे अधिकारी, राजकीय नेते, अधिकारी समाजकार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार, घडविले त्यांच्या शैक्षणिक योगदानाने विदेशातही त्यांचे अनेक विद्यार्थी कार्यरत आहेत.

बडे उद्योगपती आहेत. शहरात डॉक्टर्स व वकील वर्ग तसेच तालुक्यातील गावा-गावात त्यांचे विद्यार्थी आहेत. त्यांच्या या योगदानाचा एक अनोखा अनुभव नुकताच आला. गोयगाव येथील त्यांचे विद्यार्थी व तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रात धोंडीरामसिंह राजपूत यांच्या पावलावर पाऊल ठेऊन पत्रकारिता पदवी(बी.जे) प्राप्त केलेले व सध्या पोलीस पाटील म्हणून कार्यरत असलेले सूर्यकांत रामदास मोटे पाटील या गुरु-शिष्याचा योगायोग एकाच मंचवर नुकताच अनुभवयाला मिळाला.निमित्त होते छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्कार-२०२६च्या वितरणाचे. दोघेही गुर-शिष्य मंचवर येताच लातूर विभागीय शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव अनुपमा शिला रामचंद्र भंडारी, तसेच छत्रपती संभाजीनगरच्या बजाज ऑटो चे इंजीनिअर मारोती कृष्णा देसाई आणि झी टॉकीज फेम कलाकार संदीप जाधव यांनी या गुरू-शिष्याचा मोठया आदराने एकाच मोठया शालीत व बुके देऊन हृदयस्पर्शी गौरव केला. उपस्थितांनी या प्रसंगी जोरदार दाद देत टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.



## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची शत्रुघ्न काटे यांच्या पुणे निवासस्थानी सदिच्छा भेट

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या निवासस्थानी गुरुवारी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी काटे यांच्या घरी विराजमान असलेल्या श्री गणरायाची आरती करून उत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील मान्यवरांच्या घरी जाऊन शुभेच्छा देण्याच्या प्रथा असतात.

त्या अनुषंगाने महसूल मंत्री बावनकुळे यांनी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या घरी भेट देऊन कुटुंबीयांशी संवाद साधला.

या भेटीदरम्यान शहरातील पक्ष संघटना, स्थानिक विकासकामे आणि गणेशोत्सव काळातील सुरक्षा-व्यवस्थेवरही चर्चा झाली.

महसूल मंत्री बावनकुळे यांचे आमच्या निवासस्थानी आगमन होणे आणि त्यांच्या हस्ते बाप्पाची महाआरती संपन्न होणे, हा माझ्यासाठी आणि माझ्या संपूर्ण काटे परिवारासाठी अत्यंत सुखद क्षण आहे.

अत्यंत व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून दिलेली भेट आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या संघटनात्मक बाबींवर केलेले मार्गदर्शन आम्हा सर्व भाजप कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा देणारे आहे अशी प्रतिक्रिया शत्रृघ्न काटे यांनी व्यक्त केली. याप्रसंगी पिंपरी चिंचवड भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते

# उत्तम मार्दव धर्म आपल्याला अहंकाराचा त्याग करण्याची प्रेरणा देतो. आचार्य विनम्रसागरजी महाराज





छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – पर्युषण महापर्वाच्या द्वितीय दिवशी, गुरुवार (दि. १७ सप्टेंबर) रोजी उत्तम मार्दव धर्माच्या पावन पर्वानिमित्त परमपूज्य आचार्य श्री १०८ विनम्रसागरजी महाराज ससंघ यांच्या मंगल सान्निध्यात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवाबपुरा येथील श्री आचार्य गुप्तिनंदीजी सभागृह, गणधर वलय विधान निर्मित श्री हीराचंद कस्तूरचंद कासलीवाल (हीराकाका) प्रांगण येथे धार्मिक विधी केली.

यावेळी सौधर्म इंद्र होण्याचा मान श्री प्रवीणकुमारजी, डॉ. शैलेशकुमारजी व श्री मानकचंदजी चांदीवाल परिवार, ढाकलगाववाला तसेच सौ. ललितादेवी, श्री अनिलकुमारजी, सौ. पूजाजी, श्री हर्षलजी व कु. मिहिका सेठी परिवार, यांना प्राप्त झाला आहे.

दरम्यान, राजाबाजार येथील जैन मंदिरात विजयादेवी, निलेश, नितीन सेठी परिवारास सौधर्म इंद्र होण्याचे पुण्यार्जन लाभले. त्यांच्या हस्ते भगवान श्रीजींचा अभिषेक करण्यात आला. तसेच शांतिधारेचे सौभाग्य राखीदेवी, किरण, निखिल व खुशबू गंगवाल परिवारास प्राप्त झाले.उत्तम मार्दव धर्म अहंकाराच्या विसर्जनाची प्रेरणा देतो

खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर, राजाबाजार यांच्या वतीने आयोजित पर्युषण पर्वात उत्तम मार्दव धमचि महत्त्व विशद करताना आचार्य विनम्रसागरजी गुरुदेव म्हणाले की, अहंकार ही जीवनातील सर्वात मोठी समस्या असून समर्पण हाच त्यावरील प्रभावी उपाय आहे. समर्पणामुळे जीवन स्वर्गासमान बनते. उत्तम मार्दव धर्म आपल्याला अहंकाराचा त्याग करण्याची प्रेरणा देतो. आत्मा आणि परमात्मा, भक्त आणि भगवान यांच्या मध्ये अहंकाराचा पडदा असतो. हा पडदा दूर होताच भक्ताला भगवानाचा साक्षात्कार होतो. अहंकार या जगात कोणाचाही टिकलेला नाही. रावण, कंस आणि दुर्योधन यांची उदाहरणे आपल्या समोर आहेत. अहंकारामुळेच त्यांना पतनाला सामोरे जावे लागले. जोडण्यासोबतच सोडण्याचाही अहंकार असतो. संपत्ती मिळवणे ही मोठी गोष्ट नाही; संपत्ती मिळाल्यानंतरही विनम्रता कायम ठेवणे ही खरी मोठी गोष्ट आहे. जीवनात उंची गाठणे महत्त्वाचे नाही, तर त्या उंचीवर टिकून राहणे अधिक महत्त्वाचे आहे.

गुरुदेव म्हणाले की, साधना करताना संवेदनशीलतेला विसरू नका. संपत्तीपेक्षा माणसांची मने जिंकायला शिका. जीवनात येणाऱ्या अडचणींनी घाबरून जाऊ नका. एका फुलाची उपमा देताना ते म्हणाले की, फांदीपासून तुटलेल्या फुलानेही जीवनाचे सत्य सांगितले आहे. जगात परीक्षा नेहमी हिरा आणि सोन्याचीच घेतली जाते; काच आणि कोळशाची परीक्षा घेतली जात नाही. म्हणूनच जीवनात संकटे आणि अडचणी आल्या, तर घाबरू नका. धैर्याने आणि संयमाने त्यावर मात करण्याचा प्रयत्न करा. कारण लक्षात ठेवा, परीक्षा नेहमी चांगल्या आणि सच्च्या व्यक्तीचीच घेतली जाते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ‘स्वच्छता ही सेवा २०२६’ अभियानाला गती

## राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची हर्सुल घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला अभ्यासपूर्ण क्षेत्रभेट




छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- देशव्यापी ‘स्वच्छता ही सेवा २०२६’ अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, क्षेत्र संकार्य प्रभाग, क्षेत्रीय कार्यालय – छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने हर्सुल येथील महानगरपालिकेमार्फत चाल विण्यात येणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला अभ्यासपूर्ण क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे संचालक व क्षेत्रीय प्रमुख श्री. जयप्रकाश होनराव तसेच कार्यालय अध्यक्ष व वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी श्री. मुकेश बाबू यांच्या नेतृत्वाखाली NSO चे अधिकारी व कर्मचारी यांनी या क्षेत्रभेटीत सहभाग घेतला.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे आणि उपआयुक्त श्री. नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक श्रीमती रेणुका गायकवाड यांनी या क्षेत्रभेटीचे समन्वयन केले. प्रकल्पाचे प्रभारी श्री. तन्वीर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना प्रकल्पातील विविध घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियांची सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण, प्रक्रिया, सेंद्रिय कचऱ्यापासून खतनिर्मिती तसेच संसाधन पुनर्प्राप्ती याबाबत प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. शहरी भागातील घनकचरा व्यवस्थापनाची कार्यपद्धती, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या उपयुक्त संसाधनांची प्रक्रिया यांचा NSO अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

या प्रसंगी श्री. जयप्रकाश होनराव, संचालक यांनी या ज्ञानवर्धक क्षेत्रभेटीच्या आयोजनासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचारी तसेच प्रकल्प व्यवस्थापन टीमचे आभार मानले. तसेच स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनविण्याचे आवाहन त्यांनी केले.

कचऱ्याचे उगमस्थानीच योग्य वर्गीकरण करणे, स्वच्छता राखणे आणि पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

‘स्वच्छता ही सेवा २०२६’ अभियानाच्या माध्यमातून स्वच्छता, शाश्वत कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक व्यापक करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले.

# गुरु परिवारच्या अध्यक्षपदी सुनील सेठी, सचिवपदी सावन चुडीवाल

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- क्रांतिकारी राष्ट्रसंत समाधिस्त आचार्य श्री १०८ तरुणसागरजी महाराज यांच्या पावन प्रेरणेने स्थापन झालेल्या गुरु परिवार, छत्रपती संभाजीनगरच्या सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. परमपूज्य क्षुल्लक श्री पर्वसागरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली खडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्वनाथ मंदिर, राजाबाजार अंतर्गत ही कार्यकारिणी गठित करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी सुनील सुभाषचंद्र सेठी, कार्याध्यक्षपदी अनुज दगडा, उपाध्यक्षपदी पवन पाटणी, सचिवपदी सावन उमेश चुडीवाल, सहसचिवपदी गौरव कासलीवाल, कोषाध्यक्षपदी रोहित गंगवाल, तर सहकोषाध्यक्षपदी सागर पाटणी यांची नियुक्ती करण्यात आली.

तसेच सांस्कृतिक प्रमुख म्हणून कुणाल ठोले व प्रशांत काला, क्रीडा प्रमुख म्हणून प्रसाद दगडा व राकेश पांडे, जनसंपर्क प्रमुख म्हणून सचिन कासलीवाल (दादा), तर सोशल मीडिया प्रमुख म्हणून अंकुर साहूजी यांची निवड करण्यात आली. समन्वय समितीमध्ये जीतू गंगवाल, प्रवीण लोहाडे, अशोक अजमेरा व पप्पू (महेंद्र) ठोले यांचा समावेश करण्यात आल ा.

आचार्य श्री १०८ तरुणसागरजी महाराज यांचा सन २००८ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे चातुर्मास झाला होता. याच काळात त्यांच्या प्रेरणेतून गुरु परिवार सामाजिक संघटनेची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून गुरु परिवाराच्या माध्यमातून शहरात विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक उपक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते.

नूतन कार्यकारिणीच्या निवडीवेळी माजी अध्यक्ष विजय चांदीवाल यांनी मागील दोन वर्षांचा कार्यकाळ व ल ेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांनी आचार्य श्री तरुणसागरजी महाराज यांच्या विचार, संस्कार आणि सेवा भावनेला पुढे नेत गुरु परिवाराच्या माध्यमातून समाजात एकता, सेवा, संस्कार आणि सामाजिक उत्थानासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी गुरु परिवाराचे सर्व सदस्य उपस्थित होते. नूतन कार्यकारिणीचे सकल जैन समाजाच्या वतीने अभिनंदन करून आगामी कार्यासाठी मंगल शुभेच्छा देण्यात आल्या.

# वैजापुरात जेष्ठ गौरी उत्सवानिमित्त विविध उपक्रम उत्साहात





वैजापूर दि.१८ (प्रतिनिधी)- वैजापूर शहरात घरोघरी जेष्ठ गौरी यांचा उत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला, गोविंदशेठ धुमाळ व सुरेश शेठ धुमाळ यांच्या घरी मराठी बारा महिने व त्या,त्या महिन्यातिल उत्सव व जेष्ठ गौरीच्या बाजूला आरास सह दर्शविण्यात आले तर सुरेश शेठ धुमाळ यांच्या घरी जेष्ठ गौरीच्या बाजूला श्री,साईबाबांची शिर्डी साक्षात उभी करून बाबांच्या अनुभूतीचे दर्शन महिला व पुरुषांना आकर्षित करीत होते.

दोन्ही ठिकाणी भक्त-भाविकांनी मोठी गर्दी केली होती. शनिवार रोजी जेष्ठ गौरी विसर्जन होणार आहे.सर्वश्री गणेश धुमाळ,पांडुरंग धुमाळ,सिद्धेश्वर धुमाळ,शुभम धुमाळ,सौ,लता धुमाळ,सुरेखा धुमाळ, राजश्री धुमाळ ,संतोषी धुमाळ, सोनाली धुमाळ,श्रध्दा धुमाळ यांनी आलेल्या भक्त भाविकांचे मनोभावे स्वागत करून त्यांच्या घरी आलेल्या जेष्ठ गौरी दर्शन यांचे दर्शन घडवून आणले.माजी नगराध्यक्षा आनंदीताई अन्नदाते,नगरसेवक संजय बोरनारे, प्रति साई म्हणून भूमिका करणारे ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत,कैलास साखरे, सिद्धेश्वर साखरे, भीमाशंकर साखरे,डॉ. सचिन राजपूत ,पल्लवी राजपूत,रणजित चव्हाण, साई भ भक्त ज्ञानेश्वर माऊली गायकवाड,यांनी जेष्ठ गौरी पूजन निमित्त भेट देऊन दर्शन घेतले.

# उद्धव ठाकरेंकडून श्री गणेश महासंघाच्या गणरायाचे पूजन; निराला बाजार येथील उत्सव समिती कार्यालयास सदिच्छा भेट



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उबाठा) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निराला बाजार येथील जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या कार्यालयास भेट देऊन श्री गणेश महासंघाच्या श्री गणरायाचे गुरुवारी (दि. १७) पूजन केले. श्री गणरायाला सर्वांना आरोग्य व सुख समृद्धी आणि आनंद मिळू दे असे साकडे घालत ठाकरे यांनी आपली भावना गणरायाच्या चरणी व्यक्त केली. यावेळी त्यांच्या समवेत खासदार अनिल देसाई यांचीही उपस्थिती होती.

यावेळी श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे पाटील यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे स्वागत केले. तर कार्याध्यक्ष दिनेश राजेभासले यांनी खा. अनिल देसाई यांचे स्वागत केले. या प्रसंगी श्री गणेश महासंघाचे कार्याध्यक्ष अनिकेत निल्ल ावार, विशाल दाभाडे, संदिप शेळके, हरीश शिंदे, लक्ष्मीनारायण बाखरीया, प्रविण शिंदे, प्रितेश जैस्वाल, सुनिल धात्रक, सुधिर घाडगे, नितीन झरे, संजीवन सरोदे, प्रसाद चौधरी, अमोल ल ोहिया, राजू पाटोळे, समाधान पाटील, सागर निकम, विजय कोतकर, विशाल जाधव, निखिल बारवाल, आकाश राठोड, मुना बारवाल, नरेश हिवाळे, भरत हिवाळे, गजानन हिवाळे, शिवाजी भाऊसाहेब हिवाळे, चंद्रकांत हिवाळे, अभिषेक हिवाळे, ऋषिकेश अवसरमोल, निखिल गिरी, ओमकार मुनगीकर, केशवसिंग सूर्यवंशी, ऋषिकेश मुळे, साहिल सूर्यवंशी, कृष्णा डमाळे, ऋषिकेश हिवाळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गणेश महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख सचिन अंभोरे यांनी केले.

## जिल्हा कारागृहाला धर्मादाय आयुक्त कार्यालयातर्फे वैद्यकीय उपकरणांचे मान्यवरांच्या उपस्थितीत आज समारंभपूर्वक दान; आरोग्य शिबीरही

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- येथील धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने जिल्हा कारागृहातील बंदीजनांच्या आरोग्य सेवेसाठी पुढाकार घेतला आहे. बंदीजनांच्या विविध आरोग्य चाचण्यांसाठी लागणारे वैद्यकीय उपकरणे शनिवार दि.१९ रोजी सकाळी १० वा. जिल्हा कारागृहाला दान करण्यात येणार आहे. यानिमित्त बंदीजनांसाठी कर्करोग निदान शिबिरही आयोजीत करण्यात आले आहे.

मध्यवर्ती कारागृह, हर्सूल येथे हा कार्यक्रम होणार असून खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते हा सोहळा होणार आहे.धर्मादाय सह आयुक्त नितीन जाधव, धर्मादाय उपायुक्त उषा चव्हाण-पाटील, सहा. धर्मादाय आयुक्त प्रभू कापडे, मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक अनिल खामकर, मराठवाडा धर्मादाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत वरुडीकर यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महात्मा गांधी मिशन रुग्णाल य, सेठ नंदलाल धूत रुग्णाल य, डॉक्टर हेडगेवार रुग्णाल य, एम.आय.टी. रुग्णालय, एम.एम.आर.आय. कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद चिकलठाणा लायन्स आय हॉ स्पिटल ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, बी.एस.पी. मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉ स्पिटल, इंडीयन मेडीकल असोसिएशन या संस्थांनी या उपक्रमात सहयोग दिला आहे. हृदयरोग तपासणी, कर्करोग निदान, कान नाक घसा आणि डोळे तपासणी, महिलां करीता कॅन्सर विस्हयक पॅप स्मीअर तपासणी, मूळव्याध, त्वचारोग तपासणी, डोळ्यांकरीता मोतीबिंदू तपासणी, मोफत चष्मे वाटप, रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, हाडांची तपासणी,सी.पी.आर. प्रात्यक्षीक आणि प्रशिक्षण आदी कार्यक्रम व उपक्रम यावेळी होणार आहेत.

## कृषी पर्यटन कार्यशाळा दि.२६ रोजी

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- जागतिक पर्यटन दिनानिमित्त पर्यटन संचालनाल याच्या प्रादेशिक कार्यालयामार्फत कृषी पर्यटन कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि. २६ रोजी करण्यात आले आहे. ही कार्यशाळा विद्यानंद कृषी पर्यटन केंद्र, करोडी टोलनाक्याजवळ, सोलापूर-धुळे महामार्ग जि. छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी साडेदहा वा.होणार आहे. कार्यशाळेस विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, विभागीय कृषी सहसंचाल क सुनील वानखेडे यांच्यासह पर्यटन व कृषी पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला व्यापक प्रसिद्धी मिळवून देणे, पर्यटनस्थळांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे तसेच पर्यटनाबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यशाळेत कृषी पर्यटनासह पर्यटन विभागाच्या विविध योजना व पर्यटन क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# शिवकालीन देखाव्यात महालक्ष्मी गौराईची स्थापना




छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- देवगिरी व्हॅली, मिटमिटा येथील सौ. सीमा विनोद वटणे व परिवाराच्या वतीने शिवकालीन देखाव्यात महालक्ष्मी गौराईची स्थापना करण्यात आली आहे. या देखाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, मावळे, शिवकालीन तांब्या-पितळेच्या भांड्यांची उतरंड तसेच विविध पारंपरिक भांडी मांडण्यात आली आहेत. महाराजांच्या घोड्यांची सलामीही देखाव्याचे आकर्षण ठरत आहे. गौराई महालक्ष्मीला पारंपरिक नऊवारी काष्टा साडी परिधान करून आकर्षक साजश्रृंगार करण्यात आला आहे.

## शासकीय वसतिगृह, आधार व स्वयंम योजनेसाठी अर्जास दि.३० पर्यंत मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- उच्च शिक्षण घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह, ‘ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना’ तसेच ‘पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना’ राबविण्यात येते. या अंतर्गत वसतीगृह प्रवेशासाठी अर्ज करण्यास दि. ३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. असलेल्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील इच्छुक विद्यार्थ्यांनी शासनाच्या **https://hmasnew.mahait.org** या संकेतस्थळावर ल वकरात लवकर अर्ज सादर करावेत. पात्र विद्यार्थ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन दि. ३० सप्टेंबरपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे.

# रोजगार महाकुंभ; जिल्ह्यात एकाच दिवशी २५ ठिकाणी रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यभर एकाच दिवशी रोजगार महाकुंभ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत मंगळवार दि.२९ रोजी जिल्ह्यात २५ ठिकाणी रोजगार मेळावे आयोजीत करण्यात आले आहेत. या मेळाव्यात सहभागी होऊन रोजगाराची संधी प्राप्त करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हात अथवा परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे तसेच शासन, उद्योग/आस्थापना आणि रोजगार इच्छुक युवक-युवतींना एकाच सामायिक व्यासपीठावर आणणे या उद्देशाने हे मेळावे आयोजीत करण्यात येत आहेत. जिल्ह्यात दि.२९ रोजी विविध २५ ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी आजपावेतो ९२ उद्योजकांनी/आस्थापनांनी विविध २५ ठिकाणी सहभाग नोंदवून ६४२७ रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. यात १० वी, १२ वी, डिप्लोमा, पदवीधर, तांत्रिक-अतांत्रिक अशा सर्व समावेशक शैक्षणिक पात्रतेची रिक्त पदे उपलब्ध आहेत. जिल्ह्यातील सर्व युवक- युवतींनी रोजगार मेळाव्यासाठी नोंदणी करुन आपल्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे आयोजित मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून आपण मुलाखत देऊन रोजगार सुनिश्चित करावा. तसेच जिल्ह्यातील सर्व उद्योजकांनी आपल्या कडील रिक्तपदे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता विभागाकडे अधिसुचित करावी. जिल्हा उद्योग केंद्र, कामगार विभाग, श्ख्ब्, श्एई, उद्योग संघटना, मेडिकल असोशिएशन यांनी विविध क्षेत्रातील रोजगार देणाऱ्या आस्थापनांचा या रोजगार महाकुंभ मध्ये सहभाग नोंदवून त्यांच्याकडील रिक्त पदे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडे अधिसुचित करावे. व जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन द्यावी.

# भरती परीक्षा सुधारणांवर चर्चेसाठी उपस्थित राहण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन; २१ सप्टेंबर रोजी उच्चस्तरीय समिती भेट देणार

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी गठित उच्चस्तरीय समिती सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात भेटण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या भेटीसाठी विद्यार्थी, परीक्षार्थी व संबंधित घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, अभ्यासिका चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच परीक्षा पद्धतीबाबत सूचना मांडू इच्छिणाऱ्या नागरिकांनी भेटसाठी उपस्थित राहून आपले अनुभव व सूचना समितीसमोर मांडाव्यात. यापूर्वी ई-मेलद्वारे सूचना व अभिप्राय सादर केलेल्या विद्यार्थी व संबंधित घटकांनीही बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक सुधारणा, तसेच परीक्षा प्रक्रियेतील अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत याबाबत चर्चा होणार आहे. परीक्षा पद्धतीशी संबंधित विविध घटकांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी होऊन आपल्या सूचना मांडण्याची संधी मिळणार आहे. भरती परीक्षा पद्धती अधिक सक्षम करण्यासाठी विद्यार्थी, परीक्षार्थी, क्लास चालक-माल क व संबंधित संस्थांनी या बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

## युवा महोत्सवात हर्सूल-सावंगीच्या कला वरिष्ठ महाविद्यालयाचा डंका; हर्षदा राबडेच्या 'गुरु दक्षिणा' लघुपटाने पटकावला प्रथम क्रमांक

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या केंद्रीय युवा महोत्सवात हर्सूल-सावंगी येथील कला वरिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. या महोत्सवातील लघुपट स्पर्धेत महाविद्यालयाची बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी हर्षदा सुभाष राबडे हिने तयार केलेल्या 'गुरु दक्षिणा' या लघुपटाने प्रथम क्रमांक पटकावून महाविद्याल याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यंदाच्या केंद्रीय युवा महोत्सवात कला वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला होता. महाविद्यालयाने एकूण ८ विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. यात 'गुरु दक्षिणा' या लघुपटाने परीक्षकांची मने जिंकत पहिला क्रमांक मिळवला. या दैदिप्यमान यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रोफेसर डॉ. विशाला शर्मा यांच्या हस्ते विजेत्या हर्षदा राबडे हिचा गौरवपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या मोठ्या यशामागे महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे आणि प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. विनोद बैरागी, सहयोगी प्रा. डॉ. अरुण कोळी, डॉ. जीजा राऊत, डॉ. युवराज आंधळे, प्रा. डॉ. हिरण्यकुमार, डॉ. शारदा ठोके आणि डॉ. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.


## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,

( उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग )

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये

जा.क्र.मनपा/वृ.प्रा./२०२६/५६० दिनांक :- १८/०९/२०२६

**जाहिर प्रगटन**

या जाहिर प्रगटनाद्वारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दितील सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, वृक्षप्राधिकरण विभागाकडे वृक्ष तोडणेकरिता वरील नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये खालील अर्ज प्राप्त झालेले आहेत. ज्याअर्थी वृक्षप्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवुन आक्षेप मागविण्याचे सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने अधिनिमयातील अटी व शर्तीस अधिन राहुन प्राप्त अर्जानुसार पाहणी करुन प्रस्ताव तयार कलेले आहेत. सदरचे प्रस्ताव उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, सिध्दार्थ उद्यान मध्यवर्ती बसस्थानक जवळ येथे उपलब्ध असुन प्रस्तुत प्रकरणी आक्षेप तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन सात (०७) दिवसांच्या मुदतीत द्याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही..

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व ठिकाण | वृक्षाची मालकी | वृक्ष तोडण्याचे कारण | वृक्षाच्या प्रजाती व संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रितेश मिश्रा अध्यक्ष-छत्रपती संभाजीनगर फर्स्ट, छत्रपती संभाजीनगर | मनपा | नमूद वृक्ष कैलासनगर स्मशान भूमी आवारातील असून CSR मार्फत समशानभूमीचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्याचे काम छत्रपती संभाजीनगर फर्स्ट यांचेमार्फत सुरु असून वृक्ष विकास कामात बाधित होत असल्याने तोडणे आवश्यक आहे. | शिसम-०२, कडुनिंब-०७, विलायती चिंच-०१, गुल मोहर-०१, काशीद-०२ तोडणेस |

स्वाक्षरीत/-
(विजय पाटील)
वृक्ष अधिकारी
महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर